जनतेचा आवाज • सत्याचा ध्यास • लोकशाहीचा प्रहरी

दैनिक प्रजाशाहीचा आवाज

• निर्भीड • निष्पक्ष • निर्भय

सत्यासाठी सदैव तत्पर

वर्ष : 03 | अंक : 60 | शनिवार, 31 जुलै 2026 | पाने : 08 | किंमत : ₹ 2.00 | RNI : MAHMAR/2024/89502

खाकी वर्दीचा धाक की सत्तेच्या गृहखात्याचा माज?

ठाण्यात पोलिसांकडून तरुणांवर कथित अमानुष अत्याचार;

‘देवा भाऊ, तुमच्या गृहखात्याने लाज सोडली काय?’

संतापजनक घटनेने महाराष्ट्र हादरला!

संशयाच्या नावाखाली तरुणांचे कपडे उतरवून लैगिक स्वरुपाचा छळ, गुप्तांगाला तेल लावून पट्टयाने मारहाणेचा गंभीर आरोप; गुहखाते नेमके कोणाच्या संरक्षणासाठी? दौषी पोलिसांवर तातडीने गुन्हे दाखल करण्याची मागणी!

ठाणे | प्रतिनिधी

महाराष्ट्रात कायद्यांचे राज्य आहे कीं खाकी वर्दीच्या आड दडलेल्या काही अधिकान्यांची मनमानी सुरू आहे? सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी ज्यांच्या खांद्यावर आहे, त्याच पोलिसांवर नागरिकांचा शारीरिक आणि लैगिक स्वरूपाचा छळ केल्यांचे गंभीर आरोप होत असलील, तर सामान्य माणसांने न्याय मागायचा तरी कोणाकडे? ठाण्यातील कापूरबावडी पोलीस ठाण्यातून समोर आलेल्या कधित अमानुष अत्याचाराच्या घटनेने महाराष्ट्राच्या पोलीस यंत्रणेंवर आणि राज्याच्या गुहखात्याच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आंहे.

नेमके प्रकरण काय? संशयित म्हणूण ताबयात, पण पोलिस ठाण्यात काय घडले?

शिवसेना (उद्धव बालासाहेब ठाकरे) गटांचे विभागप्रमुख प्रदीप पुर्णेकर यांच्या हत्येनंतर ठाण्यात राजकीय वातावरण तापले आंहे. या पार्श्वभुमीवर आंदोललादस्म्यान काही तरुणांना पोलिसांनी ताबयात घेतले होते. याच कारवाईत २७ वर्षीय अर्जुन राघवजी पुंगे या रोजंदारीवर काम करणान्या तरुणाला एका व्यक्तीचा कोटो दाखवून ओळख विचारली.

मात्र पोलिस ठाण्यात त्याच्यासोबत जे घडले, त्यांचे वर्णन ऐकून कोणत्याही संवेदनशील माणसाच्या अंगावर काटा येणार नाही. त्यांचे कपडे आणि अंतर्वस्त्वे उतरविण्यात आली, गुम्तांगाला सुर्यफूल तेल लावून पटुयांने मारहाण करण्यात आली, असा गंभीर आरोप आंहे.

खाकी वर्दीलो आधिकार दिले, माणुसकी संपविण्याचा परवाना नाही!

पोलिसांना कायद्यांने अधिकार दिले आहेत. परंतु त्त्या अधिकारांच्या मर्यादा संविधानांने निश्चित केल्या आहेत. संशयाच्या आक्षारे एखाद्या व्यक्तीचा अपमान करणे, त्याला नग्न करणे किंवा लैगिक स्वरूपाचा छळ करणे याला कोणत्याही पॉरिस्सिलीत समर्थन देता येणार नाही.

देवा भाऊ, गुहखाते तुमच्याकडे; मग जबाबदारी कोणाची?

मुखयमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गुहखात्याची जबाबदारी आंहे. ठाण्यातील या गंभीर आरोपांवर केवळ चौकशीचे आश्वासन देऊग यांबणे पुरेसे ठरणार नाही.

पोलिस आयुक्तांकडून चौकशीचे आदेश; पण कारवाई कधी?

या गंभीर आरोपांची दखल घेत ठाणे पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत. तक्रारदार तरुणांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे. मात्र, जनतेला आता आश्वासन नको, पारदर्शक कारवाई हवी आहे!

आता जनतेच्या मागण्या काय?

1. पीडित तरुणाच्या तक्रारीवर कायद्यानुसार तातडीने गुन्हा दाखल करावा.
2. आरोप असलेल्या पोलिसांना चौकशी पुर्ण होईर्यत संवेदनशील जबाबदारीपासुन दूर ठेवावे.
3. कापुरबावडी पोलिस ठाण्याचे सीसीटीव्ही फुटेज सुरक्षित ठेवून तपास करावा.
4. वरिढ अधिकान्यामर्कत निष्पक्ष चौकशी करावी.
5. पीडित तरुणांची वैद्यकीय तपासणी करावी.
6. दोष सिद्ध झाल्यास कठोर कारवाई करावी.

महाराष्ट्रात सामान्य माणसाने पोलिसांकडे न्याय मागायचा की पोलिसांपासूनच संरक्षण मागायचे?

कायद्याचे रक्षण करमान्या यंत्रणेवरच असे गंभीर आरोप होत असतील, तर गुहखात्यांने याकडे गांभीर्यांने पाहण्याची वेळ आली आंहे. देवा भाऊ, मोठमोठेया घोषणा आणि कायदा-सुव्यवस्थेच्या गप्पा पुरे झाल्या! आता ठाण्यातील या गंभीर आरोपांवर जनतेला उत्तर हवे आहे. कारण संविधानापेक्षा कोणींही मोठे नाही, कायद्यपेक्षा कोणताही गणवेश मोठा नाही आणि सामान्य माणसांची प्रतिछा कोणांच्यांही अधिकारापेक्षा कमी नाही!

जनतेचा आवाज • सत्याचा ध्यास • लोकशाहीचा प्रहरी

दैनिक प्रजाशाहीचा आवाज

• निर्भीड • निष्पक्ष • निर्भय

सत्यासाठी सदैव तत्पर

वर्ष : ०३ | अंक : ६० वा | सनिवार, 31 ऑक्टोबर २०२६ | पाने : 08 | किंमत : ₹ 2.00 | RNI : MAHMAR/2024/89502

विनापरवानगी मुख्यालय सोडणाऱ्या सरकारी अधिकारी-कर्मचाऱ्यांना मोठा दणका!

गैरहजेरीच्या काळातील वेतन मिळणार नाही; वारंवार नियम मोडल्यास निलंबन आणि शिस्तभंगाची कारवाई!

२९ जुलै २०२६ च्या शासन परिपत्रकानुसार लेखी पूर्वपरवानगी बंधनकारक; नियमभंग करणाऱ्यांव ।एका ।हिन्यात कारवाई सुरू करण्यांचे निर्देश

मुंबई विशेष प्रतिनिधी

महाराष्ट्रातील शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी महत्त्वाचे वृत्त समोर आले आहे. कार्यालयीन शिस्त, वेळेचे पालन आणि मुख्यालयातील उपस्थिती याबाबत महाराष्ट्र शासनाने कठोर भूमिका घेतली असून, सक्षम प्राधिकाऱ्याची लेखी पूर्वपरवानगी न घेता मुख्यालय सोडणे, मंजुरीशिवाय रजेवर जाणे किंवा कार्यालवात अनधिकृतपणे गैरहजर राहणे संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना महागात पडू शकते. अशा गैरहजेरीच्या कालावधीत रजा वेतन अनुज्ञेय नसणार असून, वारंवार नियमांचे उर्ल्लंघन करणाऱ्यांवर निलंबनासह ।वल शिस्तभंगविवयक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागांने २९ जुलै २०२६ रोजी यासंदर्भात शासन परिपत्रक जारी केले आहे. या परिपत्रकामुळे शासकीय कार्यालयांमधील उपस्थिती आणि मुख्यालय सोडण्याच्या नियमांच्या अंमलबजावणीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

काय आहे शासनाचे नवीन परिपत्रक?

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ३८ नुसार प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्यांने नेहमी कर्तव्यपरायता राखणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ मधील नियम ३४ नुसार अन्यया स्पष्ट्र तरतूद नसल्यास शासकीय कर्मचाऱ्यचा संपूर्ण वेळ शासनाच्या सेवेसाठी असतो.

याच नियमांचा आधार घेत कार्यालयात किंवा मुख्यालयात अनुपस्थित राहण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी आवश्यक असल्यांचे शासनाने स्पष्ट केले आहे.

मुख्यालय सोडण्यापूर्वी लेखी परवानगी आवश्यक!

शासन परिपत्रकातील निर्देशांनुसार पुदील बाबींचे पालन करणे आवश्यक आहे.

1. **लेखी परवानगीशिवाय रजा नाही :** कोणत्याही शासकीय अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांने सक्षम प्राधिकाऱ्यांची लेखी पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय रजेवर जाऊ नये.
2. **मुख्यालय सोडण्यासाठी परवानगी आवश्यक :** कर्तव्याच्या कालावधीत तसेच रजेच्या कालावधीतही सक्षम प्राधिकाऱ्यांची लेखी पूर्वपरवानगी आवश्यक.
3. **अनधिकृत गैरहजेरी समजली जाणार :** पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडणे ही बाब अनधिकृत गैरहजेरी स्हणुन प्राहय धरली जाणार.
4. **गैरहजेरीच्या काळातील वेतन मिळणार नाही :** अनधिकृत गैरहजेरीच्या कालावधीत रजा वेतन

वारंवार नियम मोडल्यास निलंबनाचीही शक्यता!

शासनाने केवळ सुचना देऊन थांबण्याऐवजी संबंधित अधिका-यांवर जबाबदारी निशित केली आहे. विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिनस्त कार्यालयांमधील विनापरवानगी गैरहजर राहणाऱ्या किंवा मुख्यालय सोडणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची माहिती संकलित करून, संबंधित नियुल्ती अधिकाऱ्यांना सादर करायची आहे.

नेमका कोणाला लागू आहे हा आदेश?

या परिपत्रकात सर्वसाधारण शासकीय सेवा नियमांचा संदर्भ असला, तरी त्याच्या पार्श्वभुमीमध्ये सैनिक कल्याण विभाग, त्यांची अधिनस्त कार्यालवे आणि छत्रपती संभाजीनरगर व नाशिक येथील सेवापुर्व शिक्षण संस्यांमधील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या अनियमित उपस्थितीचे प्रकार नमुद केले आहेत. त्यामुळे या विशिष्ट परिपत्रकाला कोणताही अपवाद न ठेवता राच्यातील प्रत्येक विभागासाठी नव्याने जारी केलेला स्वतंत्र आदेश समजणे योग्य.

कर्मचाऱ्यांनी काय काळजी घ्यावी?

- ✔ रजेवर जाण्यापूर्वी सक्षम अधिकाऱ्यांची मंजुरी घ्याााा.
- ✔ मुख्यालय सोडण्यापूर्वी लेखी परवानगी घ्यावी.
- ✔ कार्यालयीन वेळेचे काटेकोर पालन करावे.
- ✔ अचानक उदभवलेल्या परिस्थिवीत वरिष्ठांना नियमित माहिती द्यावी.
- ✔ मंजुरीशिवाय गैरहजर राहणे टाळावे.
- ✔ रजा मंजुरी आणि मुख्यालय सोडण्याच्या परवानगीचा लेखी पुरावा जतन करावा.

कार्यालयीन शिस्त की प्रशासकीय जबाबदारी?

शासकीय कार्यालयांमध्ये नागरिकांची विविध कामे प्रलंबित असतात. नागरिकांच्या कामांसाठी अधिकारी-कर्मचारी विनापरवानगी अनुपस्थित असल्यास नागरिकांची कामे रखडतात. त्यामुळे कार्यालयीन उपस्थिती आणि शिस्तीचे पालन होणे ही केवळ कर्मचाऱ्यांची जबाबदारी नसून ती नागरिकांच्या सेवेशीही संबंधित आहे.

शासनाच्या या निर्देशांमुळे कार्यालवीन शिस्त अधिक प्रभावीपणे राबविण्यास मदत होणार का, याकडे आता लक्ष लागले आहे.

जनतेचा आवाज • सत्याचा ध्यास • लोकशाहीचा प्रहरी

दैनिक
प्रजाशाहीचा आवाज

• निर्भीड • निष्पक्ष • निर्भय

सत्यासाठी सदैव तत्पर

वर्ष : 03 | अंक : 60 | शुक्रवार, 30 ऑक्टोबर 2026 | पाने : 08 | किंमत : ₹ 2.00 | RNI : MAHMAR/2024/89502

मुंडवाडी गावासाठी अभिमानास्पद! पूजा बारगळ पाटील यांची परदेशात यशस्वी भरारी; मायभूमीत आगमन होताच अभिनंदनाचा वर्षाव!

बेल्जियममधील बुसेल्स येथे इन्फोसिस कंपन्नीत सिस्टीम इंजिनिअर म्हणून कार्यरत; ए. के. पटेल सेमी इंग्लिश स्कूलच्या माजी विद्यार्थिनीने आंतरराष्ट्रीय स्तरावर उमटवला कर्तृत्वाचा ठसा

मुंःडवाडी | प्रतिनिधी
संदिप आर. आळीगं

कन्नड तालुक्यातील मुंःडवाडी गावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारी अभिमानास्पद कामगिरी गावच्या कन्या पूजा बाळकृष्णा बाराळ पाटील यांनी केली आहे, ग्रामीण भागातील सामान्य वातावरणातून शिक्षणाची सुरुवात करून आपल्या मेहनतीच्या, जिद्दीच्या आणि आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी थेट परदेशात यशस्वी भरारी घेतली आहे. बेल्जियम देशातील बुसेल्स येथे नामांकित इन्फोसिस कंपनीत सिस्टीम इंजिनिअर म्हणून कार्यरत असलेल्या पुजा यांचे मायभूमीत आगमन झाल्याने मुंःडवाडी गावात आनंदांचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

त्यांच्या या यशाबद्दल गावकऱ्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

शैक्षणिक प्रवासाची प्रेरणादायी कहाणी

पूजा बारगळ पाटील यांच्या यशस्वी प्रवासाची सुरुवात मुंःडवाडी येथील ए. के. पटेल सेमी इंग्लिश स्कूलमधून झाली. याच शाळेत त्यांनी आपल्या शैक्षणिक जीवनाचा पाया भक्कम केला, शालेय शिक्षण घेत असतानाच अभ्यासातील सातत्य, मेहनत आणि काहीतरी वेगळे करून दाखविण्याची जिद्द त्यांने ै कायम जपली.

पुढे त्यांनी इलेक्ट्रिटकल अँड इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग या शाखेतून पदवीचे शिक्षण पूर्ण केले. अभियांत्रिकीचे शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी तंत्रज्ञान क्षेत्रात आपले करिअर घडविण्याचा निर्णय घेतला आणि त्यासाठी सातत्याने प्रयत्न केले.

इन्फोसिसमध्ये सिस्टीम इंजिनिअर

आपल्या शैक्षणिक गुणवतेच्या आणि कौशल्याच्या बळावर त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करण्याची संधी मिळवली. सध्या त्या बेल्जियममधील बुसेल्स येथे इन्फोसिस या नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीत सिस्टीम इंजिनिअर म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. एका छोटयाशा गावातून शिक्षण घेऊन जागतिक स्तरावरील नामांकित कंपनीत काम करण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास निश्चितच कौतुकास्पद आणि प्रेरणादायी आहे.

मायभूमीत आगमनाने गावकऱ्यांमध्ये आनंदोत्सव!

परदेशात आपल्या कामाचा ठसा उमटवल्यानंतर पूजा यांचे मायभूमीत आगमन झाल्याने कुटुंबीयांसह गावकऱ्यांमध्ये आनंदांचे वातावरण आहे. गावातील कन्येने परदेशात जाऊन स्वतःच्या कर्तृत्वाने यश संपादन करणे ही संपूर्ण मुंःडवाडी गावासाठी अभिमानाची बाव ठरली आहे. त्यांच्या यशामुळे गावातील अनेक विद्यार्थ्यांना, विशेषतः मुलींना शिक्षणाच्या माध्यमातून मोठी स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्यासाठी कठोर परिश्रम करण्याची नवी प्रेरणा मिळत आहे.

ग्रामीण भागातील मुलींसाठी ठरल्या प्रेरणास्थान!

आजच्या स्पर्धात्मक युगात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमोर अनेक आव्हाने असतात. मात्र, योग्य शिक्षण, सातत्यपूर्ण मेहनत, आत्मविश्वास आणि जिद्द असेल तर जागतिक स्तरावरही यश मिळवता येले, हे पुजा बारगळ पाटील यांनी आपल्यया कर्तृत्वातून दाखवून दिले आहे. त्यात्चे यश हे केवळ एका कुटुंबांचे किवा एका गावाचे यश नसून ग्रामीण भागातील मुलींच्या क्षमतेचा आणि गुणवत्तेचा गौरव करणारे आहे.

ए. के. पटेल सेमी इंग्लिश स्कूलचा अभिमान

विशेष म्हणजे, ज्या ए. के. पटेल सेमी इंग्लिश स्कूलमधून त्यांच्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवात झाली, त्या शाळेसाठीही त्यांची ही कामगिरी अभिमानास्पद आहे. शाळेतील शिक्षकवृंदांने दिलेले मार्गदर्शन, कुटुंबीयांचे पाठबळ आणि स्वतःची मेहनत यांच्या जोरावर त्यांनी हे यश संपादन केले आहे.

अभिनंदनाचा वर्षाव

पूजा बारगळ पाटील यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचे, त्यांचे आई-वडील तसेच ए. के. पटेल सेमी इंग्लिश स्कूलच्या शिक्षकवृंदांचे सर्व स्तरांतून अभिनंदन केले जात आहे.

मायभूमीत सुखरूप आगमन झाल्याबद्दल त्यांचे मुंःडवाडी ग्रामस्थांच्या वतीने मनःपूर्वक स्वागत करण्यात येत असून त्यांच्या पुडील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहे.

> “स्वप्न पाहा,
> मेहनत करा,
> यश नक्की मिळते!”
>
> – पूजा बारगळ पाटील

मायभूमीत आगमनानंतर कुटुंबीयांसह पूजा बारगळ पाटील

जनतेचा आवाज • सत्याचा ध्यास • लोकशाहीचा प्रहरी

दैनिक प्रजाशाहीचा आवाज

• निभीड • निष्पक्ष • निर्भय

सत्यासाठी सदैव तत्पर

वर्ष : 03 | अंक : 60 | गुरूवार, 29 ऑक्टोबर 2026 | पाने : 08 | किंमत : ₹ 2.00 | RNI : MAHMAR/2024/89502

हिंगोली काँग्रेसमधील जिल्हाध्यक्ष निवडीवरून नाराजीचा उद्रेक;

प्रस्थापितांच्या मुलाला पदाची खैरात केल्याचा आरोप!

ग्राउंड लेव्हलवर काम करणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्यावर अन्याय झाल्याची भावना; अब्दुल हाफिज वसमतकर यांची पक्षातून हकालपट्टी करण्याची प्रमोद कुलदीपके यांची मागणी

प्रमोद कुलदीपके
(काँग्रेस कार्यकर्ते)

वसमत | प्रतिनिधी

हिंगोली जिल्हा काँग्रेसमधील संघटनात्मक निवडीवरून आता पक्षांतर्गत नाराजी उफाळून आली आहे. जिल्हाध्यक्षपदाच्या निवडीत वर्षानुवर्षे पक्षासाठी तळागाळात काम करणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलून प्रस्थापित राजकीय नेत्यांच्या पुत्राला संधी देण्यात आल्याचा आरोप होत आहे. या निवडीला प्रस्थापित नेत्यांची हुंजरेगिरी आणि चाटुगिरीचे राजकारण असल्याची टीका करत काँग्रेसमधील कार्यकर्त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

वसमत तालुक्यासह हिंगोली जिल्ह्यात काँग्रेस पक्षाची संघटनात्मक वाढ करण्यासाठी प्रत्यक्ष गावोगावी जाऊन काम करण्याची गरज असताना काही नेत्यांनी केवळ प्रस्थापितांच्या भोवतीच राजकारण केल्याचा आरोप करण्यात येत आहे. अशा नेत्यांच्या कुटुंबातील व्यक्तीला थेट जिल्हाध्यक्षपदाची संधी देणे म्हणजे पक्षासाठी संघर्ष करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या योगदानाची उपेक्षा असल्याची भावना व्यक्त होत आहे.

अब्दुल हाफिज वसमतकर यांच्यावर कारवाईची मागणी

या संपूर्ण प्रकरणात अब्दुल हाफिज वसमतकर यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात यावी, अशी मागणी प्रमोद कुलदीपके यांनी केली आहे. पक्षामध्ये निष्ठावंत कार्यकर्त्यांना न्याय मिळत नसेल आणि संघटनात्मक निर्णयांमध्ये सामान्य कार्यकर्त्यांचा विचार होत नसेल, तर पक्षबाढ कशी होणार, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

प्रस्थापितांच्या राजकारणाला महत्त्व देण्यायेवजी गावोगावी काम करणाऱ्यांना संधी द्या

प्रस्थापितांच्या राजकारणाला महत्त्व देण्याऐवजी गावोगावी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी दिली पाहिजे. वसमत तालुक्यात काँग्रेसची संघटना पुन्हा मजबुत करायची असेल, तर सर्वसामान्य कार्यकर्त्यांना नेतृत्वात स्थान द्यावे [illegible]. [illegible] थांबवावी; आणि कार्यकर्ते [illegible], असा इशाराही प्रस्थापितांच्या नेत्यांच्या पुत्रांना थेट पदाची संधी दिली जात करण्यात येत आहे.

“ प्रमोद कुलदीपके यांचा सवाल :

“ज्यांनी कधी गावखेडयांमध्ये जाऊन काँग्रेस बाढवण्यासाठी संघर्ष केला नाही, अशा प्रस्थापित नेत्यांच्या मुलांना पदे देण्यापेक्षा सामान्य कार्यकर्त्यांच्या कामाची दखल घ्या. अब्दुल हाफिज वसमतकर यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात यावी. वसमत तालुक्यात काँग्रेस पक्षाची खरी बाढ करायची असेल, तर तळागाळातील कार्यकर्त्यांना संधी देणे आवश्यक आहे.” ”

यासंदर्भात सागर सोळंके यांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह

यासंदर्भात सागर सोळंके यांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. जिल्ह्यात अनेक कार्यकर्ते सामाजिक प्रश्नांवर आंदोलने, मोर्चे आणि संघर्षाच्या माध्यमातून जनतेच्या न्याय्य हक्कांसाठी अहोरात्र काम करतात, शोषित, वंचित आणि दुर्बल घटकांच्या प्रश्नांना वाचा फोडतात. मात्र, अशा कार्यकर्त्यांना संघटनेत योग्य पद आणि जबाबदारी मिळत नसताना प्रस्थापित नेत्यांच्या पुत्रांना थेट पदाची संधी दिली जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

वसमत तालुक्यात काँग्रेसची खरी बाढ करायची असेल, तर तळागाळातील कार्यकर्त्यांना नेतृत्वात स्थान द्या

दरम्यान, या निवडीवरून काँग्रेसमधील अंतर्गत मतभेद

दरम्यान, या निवडीवरून काँग्रेसमधील अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर आले असून, पक्षाचे वरिष्ठ नेतृत्व या नाराजीची दखल घेऊन कार्यकर्त्यांना न्याय देणार का, याकडे आता हिंगोली जिल्ह्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.